**नियमित दिवाणी दरखास्त क्र.०८/२०१९**

**अमोल प्रेमनाथ भोसले व इतर – धनको**

**– विरुध्द –**

**प्रेमनाथ भोसले मयत व इतर – ऋणको**

**CNR No. MHOS07-001138-2019**

## निशाणी २६ खालील आदेश

धनकोंनी प्रस्तूतचा अर्ज घर मिळकतीची वाटणी होवून मिळण्याकरीता कोर्ट कमीशनरची नेमणूक करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. धनकोंच्या कथनाप्रमाणे नियमित दिवाणी दावा क्र. १००/२००८ न्यायनिर्णय दिनांक ०५–०९–२०१८ नुसार धनको यांना मौजे वागदरी, ता. उमरगा येथील ग्रामपंचायत घर क्र. ४०० क्षेत्र ७६ फुट × ६६ फुट, मौजे वागदरी, ता. उमरगा येथील ग्रामपंचायत घर क्र. ८३ क्षेत्र १५ फुट × १८ फुट व उमरगा, ता.उमरगा येथील घरजागा प्लॉट क्र. ५३ वॉर्ड क्र. १६ क्षेत्र ३५ फुट × ३० फुट या मिळकतीमध्ये प्रत्येकी १/६ हिस्सा मिळलेला आहे. सबब, वर नमूद घर मिळकतीचे वाटणी होऊन त्यातील प्रत्येकी १/६ हिस्सा धनको क्र. १ व २ यांना वाटप होण्याकरीता कोर्ट कमीशनरची नेमणूक होणे न्याय व जरुरीचे आहे. धनको हे कोर्ट कमीशनरची फिस भरणा करण्यास तयार आहेत. प्रस्तूत अर्जावर ऋणको क्र. ६ यांनी आपले म्हणणे सादर केले.

३. धनकोचा अर्ज व पटलावर कागदपत्रे पाहिले. नियमित दिवाणी दावा क्र. १००/२००८ न्यायनिर्णय दिनांक ०५–०९–२०१८ नुसार धनको यांना मौजे वागदरी, ता. उमरगा येथील ग्रामपंचायत घर क्र. ४०० क्षेत्र ७६ फुट × ६६ फुट, मौजे वागदरी, ता. उमरगा येथील ग्रामपंचायत घर क्र. ८३ क्षेत्र १५ फुट × १८ फुट व उमरगा, ता.उमरगा येथील घरजागा प्लॉट क्र. ५३ वॉर्ड क्र. १६ क्षेत्र ३५ फुट × ३० फुट या मिळकतीमध्ये प्रत्येकी १/६ हिस्सा मिळल्याचे दिसून येत आहे. सबब, वर नमूद घर मिळकतीचे वाटणी होऊन

त्यातील प्रत्येकी १/६ हिस्सा धनको क्र. १ व २ यांना वाटप होण्याकरीता कोर्ट कमीशनरची नेमणूक होणे न्याय व जरुरीचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. धनकोंचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. कोर्ट कमीशनर म्हणून श्री. एम.एम. चिंचोलीकर, विधिज्ञ यांची नेमणूक करण्यात येत असून त्यांनी धनको यांना पुर्व सुचना देवून घरजागा मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी करावी.

३. कोर्ट कमीशनर यांनी मौजे वागदरी, ता. उमरगा येथील ग्रामपंचायत घर क्र. ४०० क्षेत्र ७६ फुट × ६६ फुट, मौजे वागदरी, ता. उमरगा येथील ग्रामपंचायत घर क्र. ८३ क्षेत्र १५ फुट × १८ फुट व उमरगा, ता.उमरगा येथील घरजागा प्लॉट क्र. ५३ वॉर्ड क्र. १६ क्षेत्र ३५ फुट × ३० फुट या मिळकतीमध्ये धनको यांना प्रत्येकी १/६ हिस्साची वाटणी करुन त्याचा सविस्तर अहवाल या न्यायालयास सादर करावा.

४. वादींनी कोर्ट कमीशनर फीस म्हणून रु.३,०००/– न्यायालयात जमा करावी.

५. कोर्ट कमीशनरची फिस न्यायालयात जमा केल्यानंतर कोर्ट कमीशनरला नेमणूकीबाबत पत्र पाठवावे.

स्वाक्षरित/–

दिनांक :–१२–१०–२०२१

(सौ.एस.एस. चव्हाण)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. २, उमरगा

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri K. D. Adwant |
| Court | --- | 2nd Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Omerga. |
| Date | --- | 12-10-2021 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 12-10-2021 |
| Order uploaded on | --- | 12-10-2021 |